**वाहतुक शाखा, पुणे शहर**
**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे**

PUNE CITY TRAFFIC POLICE

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./८२४८ /२०२३ दिनांक :-१७/११/२०२३

**प्रसिध्दीपत्रक**

**विषय :- नगर रोडवरील वाहतूक व्यवस्थेतील बदलाबाबत**

-------००--------

दि. २०/११/२०२३ रोजी महालक्ष्मी लॉन्स, खराडी या ठिकाणी श्री. मनोज जरांगे पाटील, सकल मराठा समाज यांची सभा होणार असून सदर सभेकरीता मोठया प्रमाणात नागरिक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. सभेकरीता येणाऱ्या नागरिकांची वाहने एकाचवेळी नगर रोडवर येणार असल्याने संपुर्ण नगर रोडवर वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. नगर रोडवरील वाहतूक सुरळीत रहावी याकरीता या परिसरातील वाहतूकीत आवश्यकतेनुसार बदल करणे गरजेचे आहे. याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/ ८७१/ सीआर-३७/ टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, विजयकुमार मगर, पोलीस उप आयुक्त,वाहतुक पुणे शहर, पुणे शहरातील मध्यवर्ती भागातील वाहतूकीत अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन आवश्यकतेनुसार खालीलप्रमाणे बदल करीत आहे.

**विमानतळ / लोणीकंद वाहतूक विभाग अंतर्गत**

- **सर्व प्रकारचे ट्रक, ट्रेलर, कंटेनर, मालवाहतूक करणाऱ्या जड/अवजड वाहनांचे डायव्हर्शन**

१) नगर रोडने येऊन हडपसर / सासवड / साताऱ्याकडे जाणाऱ्या वाहनांनी केसनंदमार्गे थेऊर फाटा सोलापूर रोड मार्गे इच्छितस्थळी जातील.

२) सोलापूरकडून नगरकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी सोलापूर रोडने थेऊर फाटा उजवीकडे वळुन केसनंद मार्गे नगर रोडकडे जातील.

३) शिक्रापूर येथुन पुणे शहराकडे येणारी वाहने चाकण, भोसरी मार्गे पुणे मुंबई कडे जातील.

४) जुना मुंबई पुणे हायवेवरून येणारी वाहने भोसरी, चाकण, शिक्रापुर मार्गे नगर कडे जातील.

५) खराडी बायपासवरून जुना पुणे मुंबई रोडवरील वाहने हडपसर मार्गे जातील.

६) वाघोली परिसरामधुन पुणे शहरकडे येणारे खडी, क्रशसँड, सर्व डंपर दि. २०/११/२०२३ रोजी ०६.०० ते २४.०० वा. पर्यंत पुर्णपणे बंद राहतील.

तरी वाहनचालकांनी वरील पर्यायी मार्गाचा अवलंब करुन वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे ही विनंती.

16.11.2023

(विजयकुमार मगर)
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक,
पुणे शहर

**प्रत :- सर्व संबधितांना.**